# प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना - (जिल्हा अकोला)

प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना सन.२०१८-२०१९ ,२०१९-२०२० व २०२१-२०२२ अंतर्गत केंन्द्र शासनामार्फत अकोला जिल्हयात एकूण ५४ गावांची निवड करण्यांत आली आहे.पैकी सन.२०१८-२०१९ व २०१९-२०२० अंतर्गत १८ गांवे समाविष्ठ असुन (१) अकोला तालुक्यातील सोनाळा,कोठारी (२) पातूर तालुक्यातील भंडारज बु,आस्टुल (३) बाळापूर तालुक्यातील भरतपूर , उरळ बु,चिंचोली गणु ,कळंबी महागांव ,कवठा (४) मुर्तिजापूर तालुक्यातील मंगरुळ कांबे,गोरेगांव बोरटा,अनभोरा (५) बार्शिटाकळी तालुक्यातील भेडगांव,दोनद बु (६) तेल्हारा तालुक्यातील उबारखेड,वरखेड(७) अकोट तालुक्यातील खेरखेड या गांवाचा समावेश आहे.

ज्या गांवाची अनुसूचित जाती लोकसंख्या किमान ५०% किंवा त्याचेवर आहे,अशी गांवे केंन्द्र शासनामार्फत निवडण्यांत आली असून अशा गांवामध्ये पायाभुत सुविधा उदा.रस्ते,नाली,धनकचरा,द्रवकचरा व्यवस्थापन,मलनिःसारण,शुध्द पिण्याचे पाणी पुरवठा,आर.ओ.प्लॅन्ट,पथ दिवे इत्यादी कामांनासाठी आराखडा मंजुरीनुसार निधी वितरण करुन कामे पूर्ण करणे सुरु आहे.

सोनाळा,कोटारी,भंडारज बु,कळंबी महांगाव,बोरटा,अनभोरा,उबारखडे या गांवाचे गुणाकंन मुल्यामापनानुसार सदर गांवे आदर्शग्राम घोषित करण्याकरीता शासनाला प्रस्तावित केली असुन उर्वरीत गांवामधील कामे प्रगतीपथावर असुन कामे पूर्ण होताच उर्वरीत गांवे सुध्दा आदर्शग्राम म्हणून घोषित करण्यांत येतील.

(डॉ.अनिता राठोड)
सहायक आयुक्त,
समाजकल्याण,अकोला.



Scanned with CamScanner